दै. सकाळ दि. 01-12-23

# नऊ जणांच्या टोळीला अटक; दोन पिस्टल जप्त

नांदेड, ता. ३० : जबरी चोरी, घरफोडी, दरोडा व दुचाकी चोरीतील नऊ आरोपींना पोलीसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून दोन पिस्तुसल आणि इतर हत्यारे जप्त करण्यात आली आहेत. त्यांनी केलेले चार गुन्हे उघड झाले आहेत. एकुण तीन लाख २५ हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असल्याची माहिती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी गुरूवारी (ता. ३०) पत्रकार परिषदेत दिली.



**नांदेड : चोऱ्या करणाऱ्या टोळीतील नऊ जणांना ग्रामिण पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडील दोन पिस्तुल, इतर हत्यारे असा सव्वा तीन लाखाचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.**

नांदेड ग्रामिण पोलिस ठाण्याने ही कारवाई उघडकीस आणली. यावेळी अतिरिक्त पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक, पोलिस निरीक्षक जगदीश भंडरवार, सहायक पोलीस निरिक्षक श्रीधर जगताप आदी उपस्थित होते. विष्णुपुरीत काहीजण शस्त्र घेऊन असल्याची माहिती मिळाल्यानंतर वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाला सदर ठिकाणी पाठविले. विष्णुपुरी येथे काळेश्वर कमानजवळ छापा टाकून आनंद ऊर्फ चित्रु सरदार यादव (वय २३, रा. वजीराबाद चौरस्ता), रोहित विजयकुमार कदम (वय २० रा. दत्त मंदीराचे मागे विष्णुपुरी), रवी ऊर्फ रवीलाला नारायणसिंह ठाकुर (वय ३३ रा. दर्गाजवळ गाडीपुरा), कृष्णा पिराजी गायकवाड (वय २४, रा. धनगरवाडी) व प्रविण एकनाथ हंबर्डे (वय २०, रा. हनुमान मंदीराजवळ, काळेश्वर विष्णुपुरी) या पाच जणांना ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे दोन गावठी पिस्टल, तीन जीवंत काडतुस, तीन खंजर, एक तलवार, एक लोखंडी कत्ती, दोन दुचाकी असा एकुण दोन लाख ३५ हजार नऊशे रूपयाचा मुद्देमाल जप्त केला. तसेच त्यांच्यावर ग्रामीण ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

गुन्ह्याच्या तपासात आरोपीतांकडे जबरी चोरी, चेन स्नॅचिंग, घरफोडीच्या गुन्ह्याचे अनुषंगाने तपास केला असता त्यांनी त्यांचे आणखी इतर साथीदार रोशन गोपाळ पदमवार (रा. विष्णुपुरी), हरिष देविदास शर्मा (रा. वजिराबाद), परमेश्वर बबन कंधारे (रा. विष्णुपुरी), विशाल उर्फ पप्पु नारायण हंबर्डे (रा. विष्णुपुरी), रूपेश बालाजी ठाकुर (रा. विष्णुपुरी), शेख जावेद उर्फ लड्या (रा. विष्णुपुरी) यांच्यासह मिळुन वेगवेगळ्या ठिकाणी गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. यातील आरोपीतांकडून तीन तोळे सोन्याचे दागिने, तीन मोबाईल, दोन पिस्तुल, तीन जीवंत काडतुस, तीन खंजर, एक तलवार, एक लोखंडी कत्ती, दोन दुचाकी असा एकुण सव्वा तीन लाख रूपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दै. लोकमत दि. 01-12-23

# बंदूक, शस्त्राचा धाक दाखवून लुटणारी टोळी जेरबंद



बंदूक, शस्त्राचा धाक दाखवून लूटणारी टोळी नांदेड ग्रामीण ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने जेरबंद केली आहे. त्यांच्याकडून दोन पिस्टल, जिवंत काडतुसे, तलवारी जप्त केल्या आहेत. यातील अटक आरोपी, जप्त शस्त्रे, ऐवजासह पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर अधीक्षक अबिनाशकुमार, एसडीपीओ सुशीलकुमार नायक, ठाणेदार जगदीश भंडरवार आदी.